# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

(स्वायत्त महाविद्यालय)

## राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रमाचा अहवाल व लेखे

## २०१४-१५

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर
# राष्ट्रीय सेवा योजना
## वार्षिक अहवाल
# दि. ०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ च्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वय समितीची बैठक दि. ०६/०८/२०१४ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत खालील ठराव चर्चा करुन मंजूर करण्यात आले.

१) या वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेस मंजूरी देण्यात आली.

२) मागील वर्षाच्या कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला.

३) या वर्षाच्या कार्यक्रमांबद्दल चर्चा करण्यात आली.

**उपक्रम :**

**१) आव्हान- राज्यस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर :-**

दि. ०१ जून ते १० जून, २०१४ दरम्यान संत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथे राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये

i) जैस्वाल रोहण - B.Sc. III

ii) लांडगे स्नेहल - B.A. III यांनी सहभाग नोंदविला.

जैस्वाल रोहण यास या शिबीरामध्ये उत्कृष्ठ स्वंयसेवक पुरस्कार मिळाला.

**२) मी तुमच्या कॉलेजला येतोय -**

दि.०९.०८.२०१४ रोजी मी तुमच्या कॉलेजला येतोय हा आमदार अमितजी विलासराव देशमुख यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन रा.से.यो. विभागा मार्फत करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील बहुतांशी विद्यार्थ्यांनी हजेरी लावली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव, उपप्राचार्य डॉ.पी.एन.सगर, उपप्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके, पर्यवेक्षक प्रा.के.ए.कांबळे, कार्यक्रमाधिकारी डॉ.एम.एच.गव्हाणे, प्रा.व्ही.जे.दळवी, डॉ.पी.डी.पोहेकर, स्नेहल लांडगे, लक्ष्मण मदने, रोहण जैयस्वाल, पटणे अमीत, पारगावे शुभम, प्रगती

शेळके, आरती तोडकर, रमा सरवदे, शेख समरीन आदींची उपस्थिती होती.

**३) रक्षाबंधन कार्यक्रम :-**

दि. ११.०८.२०१४ रोजी रा.से.यो.च्या वतीने रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्राचार्य, उपप्राचार्य, कार्यक्रमाधिकारी व बहुसंख्येने स्वंयसेवक सहभागी होते.

**४) माळीन दुर्घटना निधी संकलन :-**

रा.से.यो. च्या वतीने दि. १४.०८.२०१४ रोजी माळीन दुर्घटनाग्रस्तांना मदत म्हणून निधीचे संकलन करण्यासाठी स्वंयसेवकांनी व कार्यक्रमाधिकाऱ्यांनी मोहीम राबवून सुमारे ११,००० रु. निधी जमा करुन सकाळ रिलीफफंडाकडे जमा केला.

**५) वृक्षारोपन संवर्धन जनजागृती कार्यक्रम :-**

दि. १६.०८.२०१४ रोजी महाविद्यालयातील रा.से.यो. विभाग व महाराष्ट्र आर्यनसेवा यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपन व संवर्धन, वृक्षांचे महत्व, त्यांचे औषधी गुणधर्म व पर्यावरणीय फायदे या संदर्भात कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून वैध अवधूत उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके होते. या कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी व्ही.जे.दळवी, डॉ.एम.एच.गव्हाणे, डॉ.पी.डी. पोहेकर उपस्थित होते.

**६) गणपती विसर्जन मिरवणूक सहभाग :-**

लातूर जिल्हा पोलिस प्रशासनास गणपती विसर्जन मिरवणूकीसाठी सहकार्य म्हणून रा.से.यो.चे सुमारे १२५ स्वयंसेवक सहभागी झाले होते.

**७) लातूर शहर पोलीस व दक्ष नागरिक संघ कार्यक्रम :-**

दि. ०८/०९/२०१४ रोजी पोलिस मुख्यालय येथे दक्ष नागरिक संघ व पोलिस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील पार्किंगच्या संदर्भात नियोजनासाठी व सुरक्षित प्रवासासाझी प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास विभागीय आयुक्त पोलिस, जिल्हा पोलिस अधिक्षक डॉ.ज्ञ्ज्ञनेश्वर चव्हाण, उपअधिक्षक, पोलिस निरीक्षक वाहतूक व लातूर शहरातील सेवाभावी संस्था व आमच्या महाविद्यालयातील सुमारे ८० स्वंयसेवक व कार्यक्रमाधिकारी सहभागी झाले होते.

**८) मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन कार्यक्रम :**

दि. १७.०९.२०१४ रोजी मराठवाडामुक्ती संग्राम दिनानिम्मित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.बी.बी. देशमुख यांची उपस्थिती होती.

**९) शिक्षक दिन :-**

दि. ०५.०९.२०१४ रोजी शिक्षक दिनानिमित्त रा.से.यो. च्या स्वयंसेवकांनी सर्व प्राध्यापकांचे गुलाब पुष्प देवून स्वागत केले.

**१०) राष्ट्रीय सेवा योजना दिन :-**

दि. २४.०९.२०१४ रोजी रा.से.यो. दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.गोपाळरावजी पाटील साहेब, उपप्राचार्य डॉ.पी.एन.सगर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते, परभणी हे होते. या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुण्यांनी रा.से.यो. समाज व स्वंयसेवकांची भुमिका यासंदर्भात मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.व्ही.जे.दळवी यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय डॉ.एम.एच.गव्हाणे यांनी करुन दिला.

या कार्यक्रमास डॉ.पी.डी.पोहेकर, स्नेहल लांडगे, मदने लक्षमण, रोहण जैस्वाल, रमा सरवदे, प्रगती शेळके, आरती तोडकर, वाघमारे विक्रम यांच्यासह बहुतांशी स्वयंसेवक उपस्थित होते.

**११) रस्ते सुरक्षा अभियान :-**

दि. ३०.०९.२०१४ रोजी रस्ते वाहतुकी संदर्भात जनजागती व्हावी म्हणून टी.व्ही.स. मोटार कंपनी व रा.से.यो. च्या वतीने Road Saftly Programme चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात TVS मोटारचे निखली उखान यांनी स्वंयसेवकांना रस्ते वाहतूक संदर्भात काही व्हीडीओ क्लिप सादर केल्या तसेच सुरक्षित प्रवासासंदर्भात मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव, कार्यक्रमाधिकारी प्रा.व्ही.जे.दळवी, डॉ.एम.एच.गव्हाणे, डॉ.पी.डी.पोहेकर ,रा.से.यो. प्रतिनिधी स्नेहल लांडगे, लक्ष्मण मदने, रोहण जैस्वाल, रत्नराज सुर्यवंशी, पटेल अमित व बहुसंख्य स्वयंसेवक उपस्थित होते.

**१२) प्रजासत्ताक दिन संचालन निवड :**

दि. ११.०९.२०१४ ते १३.०९.२०१४ या कालावधीत डॉ.बी.आर.आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे आयोजीत राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन सोहळा निवड शिबीरामध्ये कु.राजेश्री बारगजे या विद्यार्थिनीची निवड झाली होती.

**१३) ॲडव्हेंचर कॅम्प सहभाग :-**

कु. शिवूबाई सुखदेव भोसले हिची अटल बिहारी वाजपेयी इन्स्टीटयुट ऑफ माऊंटनरिंग ॲन्ड अलाईट स्पोटर्स सोलन, मनाली (हिमाचल प्रदेश) येथे दि. १९.०९.२०१४ ते २८.०९.२०१४ दरम्यान पार पडलेल्या राष्ट्रीय स्तरावरील कॅम्पसाठी निवड झालेली होती.

**१४) स्वच्छता भारत अभियान :-**

दि. ०२ ऑक्टोबर रोजी महात्मागांधी जयंती निमित्त महाविद्यालयामध्ये रा.से.यो. च्या वतीने

स्वच्छता अभियान राबविले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा परिसर व वर्गखोल्यांची स्वच्छता केली. यामध्ये रा.से.यो. चे सुमारे २०० स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी प्रा.व्ही.जे.दळवी, डॉ.एम.एच.गव्हाणे, डॉ.पी.डी.पोहेकर आदींची उपस्थिती होती.

**१५) मतदार जनजागृती अभियान :-**

रा.से.यो. च्या वतीने ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात मतदान जागृतीसाठी विविध कार्यक्रम घेण्यात आले. दि. ०५ ऑक्टोबर रोजी मतदान जागृती संदर्भात डॉ.एम.एच.गव्हाणे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख व कार्यक्रमाधिकारी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी सहभागी झाले होत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव यांनी भुषविले, या कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी प्रा.व्ही.जे.दळवी, डॉ.पी.डी.पोहेकर व स्वयंसेवक उपस्थित होते.

**१६) राष्टीय एकता दिवस :-**

३१ ऑक्टोबर हा दिवस वल्लभभाई पटेल यांचा जन्मदिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा करण्याचे भारत सरकारने ठरविले आहे. त्या अंतर्गत महाविद्यालयामध्ये रा.से.यो. च्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील व्ही.एल.सी. हॉलमध्ये प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकतेची शपथदिली. या कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक बहुसंख्येने उपस्थित होते.

**१७) संविधान जनजागृती कार्यक्रम :**

दि. २६ नोव्हेंबर २०१४ रोजी रा.से.यो व विवेक वाहिनीच्या वतीने संविधान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संविधान चालता बोलता या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून महाविद्यालय परिसर व शहरांमध्ये, ठिक ठिकाणी कार्यक्रम घेतले व विद्यार्थी व नागरिकांमध्ये जनजागृती केली.

**१८) दक्ष नागरिक - स्वच्छता शपथमंत्र :-**

दि. २० डिसेंबर रोजी स्वच्छतेचे पाईक आम्ही अशी शपथ राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी घेतली यावेळी उपमहापौर कैलास कांबळे, उपविभागीय अधिकारी वामन खरात तसेच प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव, उपप्राचार्य डॉ.पी.एन.सगर व रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय दळवी, प्रा.डॉ.एम.एच.गव्हाणे, प्रा.डॉ.प्रिती पोहेकर व बहुसंख्य स्वंयसेवक उपस्थित होते.

**१९) व्यसनमुक्ती संकल्प अभियान :-**

३१ डिसेंबर रोजी रा.से.यो. व विवेक वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमानाने व्यसनमुक्ती संकल्प कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव, विवेकवाहिनी कार्याध्यक्ष प्रा.डॉ.संभाजी पाटील, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा.व्ही.जे.दळवी, डॉ.एम.एच.गव्हाणे, डॉ.पी.डी.पोहेकर

हे उपस्थित होते. मार्गदर्शक सुधाकर पाटील यांनी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ दिली.

**२०) रेझिंग डे :-**

२ जानेवारी पोलिस रेझिंग डे निमित्त पोलिस मुख्यालय, शिवाजी चौक ते गांधी चौक पोलिस स्टेशन पर्यंत भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागाचे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी मा.पोलिस अधिक्षक ज्ञानेश्वर चव्हाण, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी विजय दळवी, डॉ.एम.एच.गव्हाणे इत्यादि उपस्थित होते.

**२१) सावित्रीबाई फुले जयंती :-**

३ जानेवारी रा.से.यो. विभागात सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वंयस्फूर्तीने मंचार विचार मंथन कले. यावेळी रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी विजय दळवी, प्रा.डॉ.एम.एच.गव्हाणे उपस्थित होते.

**२२) वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन :-**

७ जानेवारी रोजी रा.से.यो. विभागातर्फे तसेच पोलिस प्रशासनामार्फत रेझिंग डे निमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

**२३) रेझिंग डे सप्ताह समाप्ती :-**

८ जानेवारी रोजी रेझिंग डे सप्ताह २ ते ८ जानेवारी समाप्ती निमित्त दयानंद सभागृहात बक्षीस वितरण करण्यात आले यावेळी रा.से.यो. विभागातील स्वंयसेवकांचा सहभाग होता.

**२४) महिला आरोग्य विषयक समस्या आणि निदान :-**

१४ जानेवारी रोजी रा.से.यो. विभागातर्फे महिलांच्या आरोग्य विषय समस्या व मोफत निदान शिबीर राबविण्यात आले.यावेळी अध्यक्ष मा.डॉ.गोपाळराव पाटील, डॉ.अजय पुनपाळे, एमआयटी प्राचार्य मंत्री मॅडम, तसेच रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.प्रिती पोहेकर, प्रा.विजय दळवी, प्रा.डॉ.एम.एच.गव्हाणे उपस्थित होते.

**२५) पर्यावरण संरक्षण आपली जबाबदारी :-**

१७ जानेवारी रोजी निसर्ग मित्र मंडळ व रा.से.यो.च्या वतीने पर्यावरण संरक्षण आपली जबाबदारी या विषयावर विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद मा. दिलीप कुलकर्णी यांनी केला. यावेळी अध्यक्ष प्राचार्य एस.बी.जाधव, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ.एम.एच.गव्हाणे, प्रा.श्रीहरी तलवारे, प्रा.माधव शेळके आदि उपस्थित होते.

**२६) पल्स पोलिओ अभियान :-**

१८ जानेवारी रोजी रा.से.यो. विभागातर्फे विद्यर्थ्यंनी पल्स पोलिओ अभियानात उत्स्फुर्त सहभाग

घेतला. या अभियानात ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**२७) राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन :-**

१७ ते २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन संचलनासाठी कु.राजेश्री बारगजे ह्या विद्यार्थीनीने मुंबई (शिवाजी पार्क) येथे संचलनानिमित्त सहभाग घेतला.

**२८) प्रजासत्ताक दिन साजरा.**

दि. २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन राजर्षी शाहू महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या दिवशी भारतीय राज्यघटना या विषयावर प्रा.बनसोडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव होते. कार्यक्रमास सर्व कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते.

**२९) स्वच्द लातूर सुंदर लातूर :-**

राष्ट्रीय सेवा योजना व दक्ष नागरिक संघ लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ फेब्रुवारी, २०१५ रोजी स्वच्छ लातूर सुंदर लातूर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाची स्वच्छता व लातूर शहराची स्वच्छता राखण्यासाठी चर्चा करण्यात आली. तसेच दक्ष नागरिक संघ लातूरच्या वतीने महाविद्यालयास कचराकुंडीचे वाटप करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव होते तर प्रमुख उपस्थितांमध्ये गांधी चौक पोलीस निरिक्ष्क श्री.सोनटक्के साहेब, दक्ष नागरीकचे सुपर्ण जगता, कार्यक्रमाधिकारी प्रा.व्ही.जे.दळवी, डॉ.एम.एच.गव्हाणे, डॉ.पी.डी.पोहेकर व स्वयंसेवक उपस्थित होते.

**३०) जागतिक महिला दिन कार्यक्रम :-**

जागतिक महिला दिनानिमित्त मुलींसाठी स्वरंक्षण करण्यासाठी कराटे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. दि.०५.०३.२०१५ ते ०९.०३.२०१५ दरम्यान कराटे प्रशिक्षक गोपी साठे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ५० मुलींना कराटे प्रशिक्षण दिले. दि.०९.३.२०१५ रोजी प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक श्री.बालाजी सोनटक्के व पोलिस उपनिरिक्षक मुंडे मॅडम यांच्यासमोर कराटे प्रात्यक्षिकाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ.पी.डी.पोहेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी डॉ.एम.एच.गव्हाणे, प्रा.व्ही.जे.दहवी, रत्नमाला कोळी मॅडम व स्वयंसेवक उपस्थित होते.

**३१) रक्तदान शिबीर :-**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. १८ मार्च, २०१५ रोजी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये भालचंद्र ब्लड बँकेचे डॉ.एस.जी.पाटील, किशोर पवार व त्यांचे सहकारी यांनी विशेष परिश्रम घेतले. या शिबीरामध्ये १०१ स्वयंसेवकांनी रक्तदान केले. शिबीर यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव, उपप्राचार्य डॉ.पी.एन.सगर, डॉ.एस.डी. साळुंके, कार्यक्रमाधिकारी डॉ.एम.एच.गव्हाणे,

प्रा.व्ही.जे.दळवी, डॉ.पी.डी.पोहेकर, स्नेहल लांडगे, लक्ष्मण मदने, रोहण जैयस्वाल, सुरजसिंग बायस, रमा सरवदे, शितल जाधव आदिंनी सहकार्य केले.

**समारोप :-**

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये वरील उल्लेख केल्याप्रमाणे विविध कार्यक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव, उपप्राचार्य डॉ.पी.एन.सगर, डॉ.एस.डी.साळूंके, प्रा.सौ.एम.एम.दुरूगकर, पर्यवेक्षक प्रा.कल्याण कांबळे, कार्यक्रमाधिकारी प्रा.व्ही.जे.दळवी, डॉ.प्रिती पोहेकर, डॉ.एम.एच.गव्हाणे, रासेयो प्रतिनिधी स्नेहल लांडगे, मदने लक्ष्मण, रोहण जैस्वाल, रमा सरवदे, सुरजसिंग बायस, राजेश्री बारगजे, प्रगती शेळके, सचिन घुले, आरती तोडकर, राठोड बाळासाहेब, जाधव शितल, बोकडे दत्तात्रय, कोटे कैलाश आदिंनी परिश्रम घेतले.

**कार्यक्रमाधिकारी** **प्राचार्य**